# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी २२६१७९६९ फॅक्स – २२६९०००७

E-mail : desk18@ dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


**Web Notification** / SPEED POST

का.क्र. :१८/तंशिसं/संस्था-पत्र/२०१७/५३

दिनांक :- ०४/०५/२०१७

प्रति,

संबंधित प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता,

पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी व तत्सम संस्था व

त्यामध्ये शिक्षण घेणारे अल्पसंख्यांक विद्यार्थी

विषय :-केंद्र शासनाची गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्तीचा लाभ प्राप्त केलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी सूचना...

संदर्भ : १) भारत सरकार, मिनिस्ट्री ऑफ मायनॉरीटी अफेअर्स(स्कॉलरशिप डीव्हीजन), नवी दिल्ली यांचे पत्र क्र. ५-४/२०१६-एसएस, दि. ०५/०४/२०१७.

भारत सरकार, मिनिस्ट्री ऑफ मायनॉरीटी अफेअर्स (स्कॉलरशिप डीव्हीजन), नवी दिल्ली यांच्या वरील संदर्भीय पत्रास अनुसरुन व्यावसायिक अभ्यासक्रम चालविण्या-या पात्र संस्थेत प्रवेश घेतलेले व केंद्र शासनाची गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्तीचा लाभ प्राप्त केलेले अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, मंजूर शिष्यवृत्तीची रक्कम बँक खात्यात जमा झाल्यानंतर शिल्लक राहिलेली व न भरलेली संस्थेची प्रवेश शुल्क व शिक्षण शुल्काची रक्कम म्हणून संबंधित संस्थेकडे १५ दिवसांच्या आत जमा करावी अन्यथा पुढील वर्षी त्यांचे शिष्यवृतीच्या नूतनीकरणासाठीचे अर्ज संस्थेकडून स्विकारण्यात येणार नाहीत. तसेच,

व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या सर्व संबंधित पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी व तत्सम संस्थांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेत व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशित व शिकणा-या ज्या विद्यार्थ्यांना **केंद्र शासनाची अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजनांची** रक्कम बँक खात्यात प्राप्त झाल्यानंतरही संस्थेच्या शिल्लक राहिलेली प्रवेश व शिक्षण शुल्काची रक्कम भरण्यासाठी वापरत नाही अशा विद्यार्थ्यांचे पुढील शैक्षणिक वर्षामध्ये ऑनलाईन शिष्यवृत्तीचे नूतनीकरणाचे अर्ज संस्थेने स्क्रुटीनी करुन मंजुरी व पुढील कार्यवाहीसाठी पाठवू नयेत व तसेच त्याबाबतच्या सर्व सूचना संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

( चंद्रशेखर ओक भा.प्र.से. )

संचालक तथा नोडल अधिकारी

तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.,मुंबई.

प्रत :-

१. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहीती साठी.

२. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन. अल्पसंख्यांक विकास विभाग, मुंबई ४०० ०३२. यांना माहीती साठी.

कृमाप

३. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद यांना माहितीसाठी.

४. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनस संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय दंत विद्यालय इमारत, सी. एस. टी. स्टेशन जवळ, मुंबई. - ४०० ००१ यांनी त्यांच्या अखत्यारीत येणा-या व्यायसायिक अभ्यासक्रम चालविणा-या सर्व संस्थांना कळवावे.

५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिंल्डींग, पुणे - ४११ ००१ यांनी त्यांच्या अखत्यारीत येणा-या व्यायसायिक अभ्यासक्रम चालविणा-या सर्व संस्थांना कळवावे.